

कु. मुनिश्वर संध्या रामचंद्र,
अर्थशास्त्र विभाग,
राजाराम महाविद्यालय,
कोल्हापूर.

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, हा संशोधन प्रबंध पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचा वित्तीय व व्यवस्थापकिय अभ्यास मी स्वत: संशोधित केला असून यापूर्वी हा शोध प्रबंध कोणत्याही विद्यापिठीय स्तरावर कोणतीही पदवी वा पदविका मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही.

कोल्हापूर
दिनांक ३०।११।९२

S.R. Munishwar
[ कु. मुनिश्वर संध्या रामचंद्र ]

-: प्रमाणपत्र :-

राजाराम कॉलेज, कोल्हापूर मधील कु. सुनिलवर लेंढ्या रा. यांनी एम. फील पदवीसाठी "पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचा ( समिती ) वित्तीय व व्यवस्थापकीय अभ्यास" या शोध निबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. हा शोध निबंध एम. फील ( अर्थशास्त्र ) या पदवी साठी शिवाजी विद्यापीठाकडे सादर करण्यात येत आहे. सदर शोध निबंध अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केला नाही.

संशोधन मार्गदर्शक,

डॉ. लीला पाटील
कर्मवीर हिरे, महाविद्यालय,
गारगोटी, जि. कोल्हापूर.

दिनांक :

## -: ऋण निर्देश :-

"पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचा वित्तिय व व्यवस्थापकिय अभ्यास"

या विषयी फक्त कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थानांच्या वित्तिय व व्यवस्थापकिय व्यवहारांचा अभ्यास करताना मनामध्ये अनेक शंका, कुशंका होत्या. कारण अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून प्रथमच याकडे पाहिले गेले आहे.

हिंदु धर्माचा विचार केल्यास आपणास असे दिसून येते अर्थात, मुसलमान धर्म किंवा जैन धर्म यांचाही थोड्याफार प्रमाणात विचार केला तर या प्रत्येक देवस्थानांना त्यांचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी पुर्वीपासून इनामी जमिनी दान दिलेल्या दिसून येतात, त्याचप्रमाणे देवतांना, व्यक्ती ज्या वस्तू सेवन करतात त्याही दान केल्या जातात. यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा व व्यवस्थापनाचा अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे ठरते. कारण एकूण उत्पन्नाची उलाढाल ही मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्याकडे अर्थशास्त्रीय विचार होणे अगत्याचे आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर एम.फिल. [अर्थशास्त्र] या पदवीसाठी सदरचा शोधनिबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. कारण एम.फिल. [अर्थशास्त्र] या पदवीच्या विषय निवडीपासून अखेरपर्यन्त माझे आदरणीय मार्गदर्शक, एक प्रसिध्द लेखिका, एक सामाजिक कार्यकर्त्या, गारगोटी येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या कुशल उपप्राचार्या व अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.श्रीमती लिला पाटील या मला मार्गदर्शिका म्हणून लाभल्या हे मी माझे भाग्य समजते. त्यांच्या सखोल ज्ञानाने, कुशल मार्गदर्शनाने व त्यांच्या क्रियाशील सहकार्यामुळे माझ्या शोधनिबंधास उठावदारपणा आला. त्यांच्या क्रियाशील सहकार्यामुळे मी हा शोधनिबंध अल्प वेळेत पूर्ण करू शकले. त्यामुळे

त्यांनी केलेले मार्गदर्शन हे मौलिक अशाच प्रकारचे आहे; त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी शिवाजी विद्यापीठातील माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. वि. भा. ढुगे, सध्याचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रविंद्र दोशी, प्रा. जे. एफ. पाटील, प्रा. डांगे, प्रा. दांडगे, प्रा. कु. अस्मिता कुलकर्णी आदींचे मनमोकळेपणाचे जे वैयक्तिक मार्गदर्शन लाभले त्या ऋणाचे आभार औपचारिकपणे मानण्याऐवजी त्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजते.

या अभ्यासासाठी मा. प्राचार्य प्रो. श्री. पत्की, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर तसेच याच महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्र. के. विप्रे व प्रा. बी. एस. कुलकर्णी यांचा आदरपुर्वक उल्लेख करावा वाटतो. त्यांची प्रेरणा व सहकार्य अनमोल व अविस्मरणीय आहे.

अभ्यासा संदर्भात पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. डी. वाय. पाटील, मा. सचिव पी. एम. पोवार, समितीतील सदस्य, ईंजिनियरिंग विभागातील वास्तुशिल्पाचे मोरे साहेब, कर्नाळे साहेब, स. रा. देशपांडे साहेब, व कार्यालयातील इतर कर्मचारी वर्ग - गवंडी, कुंभार, बोकीलबाई, उदय कुलकर्णी, सुभाष कुलकर्णी, ढुगेरबाई, वायचळ, हेडक्लार्क विंधू यांच्या सहकार्याने मी माझा प्रबंध पूर्ण करु शकले याचे मला बहुमोल सहकार्य लाभले, त्यांची

मी सदैव ऋणी राहीन.

याचबरोबर अर्थशास्त्र विभागातील लेखनिक श्री. शेख व संशोधक सहाय्यक श्री. साबळे सर यांचाही महत्वाचा वाटा आहे.

कोल्हापूर.

दिनांक :- प्रा. कु. एस. आर. मुनिश्वर.

अनुक्रमणिका


| प्रकरण नंबर | प्रकरणाचे नाव | पान नं. |
| --- | --- | --- |
| १] | ऐतिहासिक मागोवा | 1 |
| | १. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचा थोडक्यात इतिहास. | |
| | २. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळ स्थापण्यामागील हेतू. | |
| | ३. देवस्थान मंडळाच्या कार्याचा अभ्यास | |
| २] | मंडळाची रचना | 17 |
| | १. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाच्या अंतर्गत येणारा विभाग. | |
| | २. सरकार आणि इतर संस्थाचे कार्य. | |
| ३] | पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचे व्यवस्थापन - | 124 |
| | अ] [१] समितीतील सदस्य. व त्यांची कार्ये. | |
| | [२] कार्यालये आणि कारकून संवर्ग | |
| | [३] अधिका-यांची कार्ये. | |
| | ब] देवस्थान व्यवस्थापन मंडळाची पर्यवेक्षणात्मक कार्ये | |
| | [१] वित्तीय व्यवस्थेवरील पर्यवेक्षण किंवा कार्ये | |
| | [२] इतर कार्यावरील पर्यवेक्षण | |
| ४] | पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन मंडळाचा [समितीचा] उत्पन्न आणि खर्चाचा आकृतीबंध. | 149 |
| | १. उत्पन्नाचा आकृतीबंध. | |
| | २. खर्चाचा आकृतीबंध. | |
| | ३. एकूण आकृतीबंध. | |
| | ४. गोळा केलेल्या पैशाचा उपयोग. | |
| ५] | अडचणी व उपाय योजना. | 206 |